# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
# जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-अभि धा.क्र.४९/नै.संचालक रिक्त पद/परिपत्रक/ 3828 /सन २०१९ दिनांक :- 28/3/19

/०३/ २०१९

वाचावे :-

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सीबी (१) व (१४)
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७४
३. या प्राधिकरणाकडील प्रस्ताव दिनांक ३.२.१८
४. विधी व न्याय विभागाकडील पत्र जा.क्र.१२९/७७८/सिव्हील/कॉन्फिडेन्शल/२०१८/अे ब्रँच, दि.२४.९.१८
५. कक्ष अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र जा.क्र.सनिनि ०२१८/प्र.क्र.१६/१३-सी, दिनांक १५.१०.१८
६. प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-अभिलेख धारिका क्र.४९/नैमित्तिक रिक्त जागा/७७५०/सन १८, दिनांक २६.१०.२०१८

**प्रस्तावना :-**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने उपरोक्त वाचावे क्र. ६ दिनांक २६.१०.२०१८ च्या आदेशान्वये, सहकारी संस्थांच्या समिती सदस्यांमधील रिक्त झालेल्या नैमित्तिक जागा भरणेबाबतची कार्यपध्दती निश्चित केली आहे. सदर आदेशातील मुद्या क्र. १० च्या अनुषंगाने पुढील प्रमाणे सुधारीत आदेश देण्यात येत आहे.

**-: आदेश :-**

ज्या सहकारी संस्थेच्या समितीची मुदत संस्थेच्या निवडणूकीच्या निकालाच्या दिनांकापासून अडीच वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त झालेली आहे, अशा समितीत निर्माण झालेल्या नैमित्तिक रिक्त जागा, ज्या प्रवर्गातील आहेत त्याच प्रवर्गातील पात्र सदस्यांमधून, स्वीकृतीने संस्थेच्या समितीकडून संचालक मंडळ सभेमध्ये निर्णय घेऊन भरण्यात येईल. सदर नैमित्तिक पद कोणत्या तारखेस रिक्त झाले आहे ही बाब विचारात न घेता असे नैमित्तिक रिक्त पद भरतेवेळी समितीची मुदत ही अडीच वर्षापेक्षा जास्त झाली असल्यास ती स्वीकृतीने भरता येऊ शकेल.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशाने**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
सत्यमेव जयते

28/03/19

**(यशवंत गिरी)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य,पुणे.

**प्रति,**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)